मराठी स्तोत्र

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ८९९/२७ (८६६)

ग्रंथ नाम दत्त लहरी

विषय स्तो० स्तु० भूपाळ्या

दत्त लहरी

१२७

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

Datora Library No 7

॥ अथश्रीदत्तलहरीप्रारंभः ॥

" Joint project of Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(2)

(2A)

उपोद्घात.

सांप्रत गुरुभक्त ह्मणविणारे पुष्कळ असून गुरूचें चरित्र वाचणारे सुमार १०,००० वर असतील व एक वेळ गुरुचारित्र वाचलेले असे सुमार २०,००० वर असतील परंतु गुरूचा खरा महिमा सर्वत्रांस ठाऊक नाहीं, याचें कारण या ग्रंथाचें नांव ही ठाऊक असणारे हजारांत एक दोन सांपडतील असें ह्मणण्यास काहीं चिंता नाहीं, नांव ठाऊक असणारां पैकीं संस्कृताचें खरेंखरें ज्ञान एखाद्यास असेल तर सांगवतनाहीं, या वरून स्पष्टच झालें. आतां विचारा अंतीं पाहिलें असतां गुरूचा खरा महिमा कळविणें हें माझें कर्तव्य आहे असें समजून वहुत प्रयत्नानें मिळविलेला जो दत्तलहरी ग्रंथ बहुत प्राचीन ऋषीनें केलेला त्याचें भाषांतर नामांकित शास्त्रयां जवळून करवून मी अल्पमती भक्तजनांस सादर करितों. आश्रय मिळाल्यास थोडया किमती मध्यें दत्त महात्मग्रंथ छापला जाईल, व सर्व भक्तजनांस मिळेल ग्रंथ सुमार १०,००० आहे पांच रुपये पावेतों पडतील

(3)

श्रीगणेशायनमः ॥ दलादन ह्या नांवाचा ऋषी ह्मणतो. मायेच्या गुणानीं (सत्व, रज, आणि तमोगुण ह्यानीं) युक्त झाल्यामुळें ज्या पासून ह्या जगाचे उत्पत्ति, स्थिति आणि लय होतात, सर्व जगास व्यापक, सर्व काळ आनंदरूप, ज्याचा महिमा सर्व वेदांतील उपनिषदांनीं कळतो, जो साधूंस किंवा

विभुर्नित्यानंदःश्रुतिगणशिरोवद्यमहिमायतोजन्माद्यस्यप्रभव
तिसमायागुणवतः ॥ सदाधारःसत्योजयतुपुरुषार्थैकफलदः
सदादत्तात्रेयोविहरतुमुदाज्ञानलहरिः॥ १ ॥

सर्वजगास आधारभूत, नाशरहित, मोक्षपुरुषार्थरूप मुख्यफल देणारा आणि ज्ञानरूप लहरीनींयुक्त जो दत्तनामक अत्रिऋषीचा पुत्र तो सर्वकाळ सर्वांपेक्षां उत्कृष्टपणानें वर्तो आणि आनंदानें क्रीडा करो ॥ १ ॥

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(3A)

आतां ऋषि, साक्षात्, दत्तात्रेयाची स्तुती करितो. हे देवा, जगाची उत्पत्ति, पालन आणि संहार हे करण्यास अधिकारी केलेले जे ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर ते तुझ्या चरण कमलाची पूजा करितात. तसेंच इंद्र, अग्नि इत्या

हरीशब्रह्माणःपदकमलपूजांविदधतेजगद्रक्षाशिक्षाजननकरणे
तेह्यधिकृताः अभूवन्निंद्राद्याहरिदधिपतांदेवमुनयःपदंतत्वंप्रापुः
शशिदिनकरौज्योतिरमलं ॥ २ ॥

दि देवांस दिशांचें स्वामित्व तुझ्यापासून प्राप्तझालें आणि नारदादिक देव र्षींस उत्तम तत्वज्ञान प्राप्तझालं. तसेंच चंद्र आणि सूर्य ह्यांस निर्मळतेज प्राप्त झालें ॥ २ ॥

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(५)

दत्त० २ उत्कृष्ठ तेजोमूर्ति जो तूं त्या तुझ्या सुंदरतेजाचे अतिसूक्ष्म भाग असे जे सूर्य, चंद्र, नक्षत्रें आणि अग्नि हे मोठे तेजाचे राशी असल्या मुळें या काळीं सकलजगास व्यापून राहिलेले व ज्यांचें चरित्र सकललोकांत मान्य आणि ल०

परज्योतिर्मूर्तेस्तवरुचिरतेजःकणलवाजगद्व्याप्येदानींतपनश
शिताराहुतभुजः ॥ महातेजःपुंजाःसकलजगदाराध्यचरिताश्च
रंत्येवंलोकान्नतजनमनोभीष्टफलदाः ॥ ३ ॥

आपल्यास नम्रझालेल्या जनांच्या मनानें इच्छिलें जें फळ त्यास देणारे अशा प्रकारचे होऊन सर्वलोकांत संचार करितात ॥ ३ ॥ २

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(४A)

संपूर्णजीवांनीं युक्त हें जग, तुझ्या मायेचें स्वरूप असल्यामुळें ह्यास हें तुझेंच रूप असें सकलवेदांतील उपनिषदांचे समुदाय ह्मणतात आणि अनेक वार, हें जग, प्रथम तूंच उत्पन्न करून त्याचें पालन व संहारही केलेस या

भवन्मायारूपंजगदखिलजीवात्मकमिदंभवद्रूपंप्राहुर्नीखिलनि
गमांतश्रुतिचयाः॥ त्वयासृष्टंचादौत्द्दतमवितमेतत्तदधुनाप्रभावं
तेवेत्तुंप्रभवतिजनःकोवनितले ॥ ४ ॥

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

कारणानें हें तुझ्या पेक्षां ज्ञानहीन आहे यास्तव आतां ह्या भूतलावरील कोणी हो मनुष्य तुझा प्रताप समजण्यास समर्थ नाहीं ॥ ४ ॥

(5)

हे कृपासिंधो (दयेच्या सागरा) तुला वस्तुतः जन्म नसतांही जन्म झाला असें जें शास्त्रांत सांगितलें हें केवळ जगाचा रक्षणा साठींच सांगितलें आहे, असें जर न ह्मणावें तर वस्तुतः इच्छारहित असल्यामुळें ज्याला कर्तृत्व सं-

कृपासिंधोतावज्जनुरजननस्याप्यकथितंजगद्रक्षादीक्षाभवतिखलु
नोचेत्कथमिदं अनीहस्याकर्तुस्तवजगतिकर्मोपकृतयेप्रमाणीकर्तुं
वास्वरुतनिगमार्थानितिमतिः ॥ ५ ॥

भवत नाहीं अशा प्रकारचा जो तूं त्या तुला ह्या जगांतील कर्मांचा संबंध कसा घडेल, तस्मात् मला असें वाटतें कीं हें तुझें कर्तृत्वदाखविणें केवळ परोपकारार्थ किंवा आपणच प्रगटकेलेल्या वेदांच्या अर्थास खरेपणा दाखविण्यासाठीं आहे ॥ ५ ॥

Joint Project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule & the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(5A)

मनास व वाणीस अगोचर, निर्मलज्ञानस्वरूप आणि ऐश्वर्यादि युक्त असा जो तूं त्या तुला संसारसंबंध आहे असें भाषण उचित् आहे काय? परंतु असें असून ही कवि क्वचित् तुला संसारसंबंधाचें वर्णन करितात हें त्यांचें अज्ञान आहे, कारण जर जो कोणी वस्तुतः सत्वादि गुण रहित व अविद्येपासून

महाविद्यारूपेभगवतिनिबद्धत्वमुचितंत्वद्दवावाचागम्येपरमापिवि
मुह्यंतिकवयः ॥ अविद्यातीतःकिंयदिगुणविहीनोपिगुणवानवि
द्यायुक्तोयंत्वितिवदतिमायामपिधीः॥ ६ ॥

दूर राहणारा आहे तर तो गुणवान् आणि अविद्यायुक्त होईल काय ? तस्मात् जो तुला संसारसंबंध वास्तविक आहे असें ह्मणतो त्याची बुद्धि मायेनें नष्ट झाली आहे ॥ ६ ॥

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai "Joint project of

तूं प्रथम शुद्धस्वरूप असून लोकांचें रक्षण करावें यास्तव युगायुगाचाठा- ल०
दत्त० यीं जलजंतु, मनुष्य, मृग, पक्षि आणि अश्व इत्यादिक शरीरें धारण केलींस
४

भवानादौयादोनरमृगखगाश्वादिकतनूर्विधत्तेलोकानामवनकृति
हेतोरनुयुगं ॥ विशुद्धस्त्वंलीलानरवपुरिदानीमटसिगांपवित्री
कर्तुंवापरिजननिवासांगणतलं ॥ ७ ॥

असा तूं याकाळीं नरशरीर धारणकरून सेवकगृहांच्या अंगणतलावर फिरतोस हें तुझें कृत्य केवळ पृथ्वीला पवित्र करण्यासाठींच आहे. ४

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(6A)

अथवा ज्याचें चरित्र लोकांस कळत नाहीं, सर्वांस मूळभूत आणि परम पुरुष असा असूनही तूं लोकांत संचार करतोस हें करणें आपल्या भक्तांच्या रक्षणा करतां किंवा जगाच्या पालनासाठीं आहे. असें असतां या काळीं

जगद्रक्षार्थं वा विचरसि जगत्यात्मजनतापरित्राणायाऽऽद्यः पर
मपुरुषोऽगम्यचरितः ॥ मृषा लोके लोको वदति मनुजत्वं त
दधुना यथा श्रीकृष्णं त्वां यदुपु ब्रुवते मूढमतयः ॥ ८ ॥

जगांत लोक, तुला मनुष्य असें मानतात तें खरें नव्हे तर जसे मूढबुद्धिलोक, श्रीकृष्णास यादव असें मानित होते तद्वत् आहे ॥ ८ ॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai. "

आणि जे मोठे योगीश्वर त्यांसही नकळलेला जोमहायोग त्याविषयीं चतुर अशा तुजप्रत, कुटिलबुद्धीनें युक्त जे माझ्या सारखे लोक ते कसे जाणतील असें असूनही मीं तुला जाणतों हा केवळ, तुझ्या चरणकमलद्वयाच्या

महायोगाधीशै रविदितमहायोगचतुरं कथं जानंति त्वा कुटिल
मतयो मादृशजनाः ॥ तथापि त्वां जाने तवपदयुगांभोजभज
ना न्नचे त्वत्पादाब्जस्मृतिविषयवाणी कथ मभूत् ॥ ९ ॥

सेवनाचाच प्रताप आहे. जर असें नसेल तर तुझ्या चरण कमलाच्या स्मरणानें युक्त जी स्तुतिरूपवाणी ती मला कशी प्राप्त झाली असती ॥ ९ ॥

Rajawade Sanshodhan Mandal, Phule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai. " Joint project of the

(7A)

ज्या मध्यें, पुत्र, मित्र आणि स्त्री इत्यादिकांचें पोषणादिक करणें हा उपद्रव असून ज्याचा पार लागत नाहीं अशा संसारात बुडालेले, त्यासंसारास तरून जाण्याच्या उपायांस न करणारे, तुझ्या चरणकमलद्वयाची सेवा ज्यांनीं के-

अपारे संसारे सुतहितकलत्रादिभरणाद्युपाधौ मग्ना स्तत्तरणक
रणोपायरहिताः ॥ पतंति त्वत्पादांबुजयुगुलसेवासु विमुखा न
राः पापात्मानः प्रवरनरके शोकानिलये ॥ १० ॥

ली नाहीं आणि मनानें पापकर्माचें चिंतन करणारे असे जे नर, ते, शोकाचें केवळ गृहच असा जो श्रेष्ठ नरक त्यांत पडतात ॥ १० ॥

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. " Joint project of "

दत्त० अमृताच्या समुद्रांत सुवर्णमय द्वीपामध्यें कल्पतरूंच्या वनाचेठायीं मौक्तिक- ल०
६ कयुक्त चांदव्यानें सुशोभित आणि नवीनरत्नकृत स्तंभानीं युक्त अशा श्रे-
ष्ठ मंडपांत असंख्यातमाणिकांनीं खचित जें सिंहासन त्यावर कमलाच्या

सुधासिंधौ द्वीपे कनककलिते कल्पकवने विताने मुक्ताढ्ये नव
मणिमये मंडपवरे ॥ अशेषै र्माणिक्यैः खचितहरिपीठे ब्जकुहरे
हुताशारे ध्याये तव परममूर्तिं निखिलदां ॥ ११ ॥

" Joint property of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

गर्भामध्यें, त्रिकोणपीठाचेठायीं स्थित आणि भक्तांस संपूर्णफळ देणारी
जी तुझी श्रेष्ठ मूर्ति तिचें मीं ध्यान करतों ॥ ११ ॥ ६

अग्नीचें मंडल असून मूलाधार ह्या नावाचें जें चक्र त्यांत राहणारा व त्याचास्वामी गणपति, स्वाधिष्ठानचक्राचा स्वामी ब्रह्मा, मणिपूरकचक्रांत राहणारा विष्णु, अनाहत चक्राचास्वामी रुद्र, वडवानल, (समुद्राच्या उदकास

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

धराधाराधारे हुतवहपुरेऽधीशगणपं विधिं श्रीशेशौर्वानलपवन
व्योमानि त्हृदये ॥ युतौ जीवात्माना वधिक मवमत्य प्रविशते
विधत्ते ज्यायस्त्वं परिकलितवामेन वपुषा ॥ १२ ॥

शुष्क करणारा अग्नि), वायु, आकाश, व त्हृदयांत अतिसमीप राहणारे जीवात्मा आणि परमात्मा ह्यांचें उल्लंघनकरून ब्रह्मरंध्रांत प्रवेश करणारास दिव्यशरीरयुक्तकरून श्रेष्टत्व देतोस ॥ १२ ॥

(५)

दत्त० ७ पूर्ण चंद्रा सारखें सुशोभित आणि आपला स्वामी जो परमहंस गुरु त्यानें युक्त असें जें मस्तकस्थितब्रह्मरंध्रचक्रांतील सहस्त्रपत्रयुक्त कमल त्यामध्यें प्रगट रूपानें राहाणारा जो हंसनामक तूं त्या तुला जो योगी जाणतो. तो, ना- ल०

सहस्त्रारे नीरेरुहि सकलशीतांशुललिते सहंसे हंसं यः स्फुट म
पि भवंतं कलयते ॥ सुषुम्नावर्तिन्या तव चरणपीठेंदुसुधयाऽऽप्लु
तो भित्वा ग्रंथित्रय ममृतरूपो विचरति॥ १३ ॥

भीपासून ब्रह्मरंध्रापर्यंत गेलेली जी सुषुम्नानाडी तिच्याद्वारानें प्राप्तझालें जें तुझ्या चरणरूपचंद्रसंबंधी अमृत त्यानें अभिषेकयुक्त झाल्यामुळें सत्व, रज आणि तम ह्या त्रिगुणात्मक ग्रंथी तोडून अखंडानंद रूपानें राहतो॥१३॥ ७

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. " Joint project of the

(9A)

आधार शक्ति, पृथ्वी, कूर्म, धर्म, ज्ञान आणि वैराग्य इत्यादि देवतानीं वेष्टित, अपान वायूचें गृहासारखें स्थान व शरीरांत आकाशरूपानें राहिलेलें असें जें तुझें आधार भूत महापीठ हृदय त्याचे ठायीं राहणारा, देव, ऋ-

तवा धारे शक्तिक्षितिकमठधर्माद्यभिवृते महापीठे वैश्वानरपुर
मरूद्गेहनिलये॥ धराव्योमाकल्पे सुरमुनिमहेंद्राद्यभिनुतं म
हातेजोराशिं निगमनिलयं नौमि हृदये ॥ १४ ॥

षि, इंद्र आणि ब्रह्मदेव इत्यादिक ज्याची स्तुति करतात व वेदांचें निवासस्थान असा जो मोठा तेजोराशि त्याचें मीं चिंतन करतों ॥ १४ ॥

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. " Joint project of the "

(१०)

दत्त० ८ संसारसमुद्र तरण्यास नौकारूप असें जें तुझें चरणकमल त्याची सेवा जो करतो तो मोठ्या संसारसमुद्रास तरून जातो यास प्रमाण, आत्मस्वरूप जाणणारा मनुष्य, शोकसागरास तरून जातो अशा ल० ८

भवत्पादांभोजं भवजलधिपोतं भजति यो महासंसाराब्धिं तरति
तरती त्येव निगमः ॥ इहा मुत्र त्रातुं तव चरण मेवा त्मशरणं भ
जेभीतश्चाहंकृतिपरमनरको ह मधुना ॥ १५ ॥

अर्थाचें वेदवाक्यच आहे. यास्तव माझें मन अहंकारयुक्त झाल्यामुळें भय पावलेला मीं सांप्रतकाळीं इहलोकीं आणि परलोकीं आपलें संरक्षण हो- ण्यासाठीं आपलें रक्षण करणारा जो तुझा चरण त्याचें भजन करतों ॥ १५॥

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(10A)

जसा अग्नि, काष्ठांत गुप्तरूपानें राहतो तसा एकटाच तूं सर्वांच्या शरीरांत प्रवेश करून बहुतप्रकारयुक्तासारखा भासतोस परंतु वास्तविक दृष्टीनें पाहतां तसा नाहींस. जसा चंचल उदकांत प्रतिबिंबित झालेला चंद्र, ज-

यथा दारुष्वग्निर्निवसति तथा देह निकरे प्रविश्यं त्वं चैको ब
हुविध इवा भासि न तथा ॥ चलन्नीरे चंद्रः शतविध इवा भाति
गुणतो न चै त च्चंद्रस्यां न शतविधता ना पि चलनं ॥ १६ ॥

लाच्या चंचल पणानें बहुतप्रकारयुक्तासारखा दिसतो त्याप्रमाणें, कारण तेथें ही वास्तविक विचार पाहतां चंद्राचे ठायीं उदकाचा संबंध, अनेकत्व आणि चंचलपणा हे तिन्हीं नाहींत ॥ १६ ॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
दूरध्वनी क्रमांक (०२५६२) २३३८४८
Email ID : rajwademandaldhule@gmail.com